# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६५ दिनांक ०६/०७/२०२१

## जबरीने सोनसाखळी चोरणा-या आरोपीस बोईसर पोलीसांकडुन शिताफीने अटक एकुण ०३ चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस, एकुण ०३ मंगळसुत्र जप्त, रुपये २,२१,७००/- चा मुद्देमाल जप्त

I] दिनांक १६/०६/२०२१ रोजी १०.३५ वाजताचे सुमारास बोईसर चित्रालय येथील बी.ए.आर.सी.कॉलनी समोर बोईसर तारापुर रोडवर ता.जि.पालघर येथे दोन अज्ञात आरोपी हे मोटार सायकलवरुन येवुन, फिर्यादी सौ.आशा गुरुनाथ दुधावडे वय ५२ वर्ष, रा. चित्रालय,बोईसर यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र जबरीने चोरुन नेले होते. नमुद बाबत फिर्यादी यांनी बोईसर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्यावरुन, बोईसर पोलीस ठाणे गुरनं.I १९१/२०२१ भादंविसंक. ३९२, ३४ प्रमाणे दिनांक १६/०६/२०२१ रोजी १४.५५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचे गाभीर्य लक्षात घेवुन मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर व श्री.विश्वास वळवी, उपविभागिय पोलीस अधिकारी बोईसर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्रीकांत शिंदे, वाणगांव पोलीस ठाणे व पोउनि शरद सुरळकर, बोइसर पोलीस ठाणे, पोउपनि विजय डाखोरे, बोईसर पोलीस ठाणे यांची वेगवेगळी तपास पथके तयार केली. सदर पथकास तपासकामी सुचना व मार्गदर्शन करुन तपास पथके वेगवेगळ्या परिसरात रवाना केलेली होती. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचे धागेदोरे नसतांना कौशल्यपुर्ण गुन्हयाचा तपास करुन सपोनि श्रीकांत शिंदे, वाणगांव पोलीस ठाणे व पोउनि शरद सुरळकर, बोइसर पोलीस ठाणे व त्यांचे पथकाने सदर गुन्हयात एक आरोपीत वय २१ वर्षे, रा.अंबिवली, जि.ठाणे यास अटक केली. अटक आरोपीकडे कसुन चौकशी केली असता त्याने बोईसर व तारापूर पोलीस ठाणे येथील खालील प्रमाणे सोन्याचे मंगळसुत्र जबरी चोरी करुन ०३ गुन्हे केल्याची कबुली दिलेली आहे. सदर आरोपीत यांच्या ताब्यातुन २,२१,७००/- रुपये किंमतीचे ६२.०० ग्रॅम सोने (३ मंगळसुत्र) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

II] दिनांक १५/१२/२०२० रोजी १८.०० वा.चे सुमारास यातील फिर्यादी वय वर्षे ५५ हया यशवंतसृष्ठी येथील किराणा दुकानातुन खरेदी करुन पायी घरी जात असताना एक काळया रंगाच्या मोटार सायकल वरुन दोन अनोळखी इसम यांनी जबरदस्तीने फिर्यादीच्या गळयातील मंगळसुत्र खेचुन चोरी करुन पळुन गेले. नमुद बाबत फिर्यादी यांनी बोईसर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्यावरुन, बोईसर पोलीस ठाणे गुरनं.I ३१८/२०२० भादंविसंक. ३९२, ३४ प्रमाणे दिनांक २६/१२/२०२० रोजी ०१.३८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

III] दिनांक ०८/०६/२०२१ रोजी १९.१० वा.चे सुमारास यातील फिर्यादी हया बालाजी कॉम्लेंक्स ते परळी नाका येथे पायी फिरुन घरी जात असताना दोन अनोळखी इसम हे मोटार सायकलसह रोडवर उभे होते. फिर्यादी हया मोटार सायकल जवळ आले नंतर यातील दोन आरोपीत यांनी जबरदस्तीने फिर्यादीच्या गळयातील मंगळसुत्र खेचुन चोरी करुन पळुन गेले. नमुद बाबत फिर्यादी यांनी तारापुर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्यावरुन, तारापुर पोलीस ठाणे गुरनं.ा ३५/२०२१ भादंविसंक. ३९२, ३४ प्रमाणे दिनांक ०८/०६/२०२१ रोजी २२.४२ वाजता गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र.व कलम | मिळाला माल |
|---|---|---|---|
| १. | बोईसर | १९१/२०२१<br>भा.द.वि.सं.क.३९२,३४ | ८३,७००/- रुपये किंमतीचे दोन वाटया असलेले २७ ग्रॅम वजनाचे डिझाईनचे व त्यामध्ये काळे मनी असलेले सोन्याचे मंगळसुत्र जु.वा.किं.सु. |
| २. | बोईसर | ३१८/२०२०<br>भा.द.वि.सं.क.३९२,३४ | ६८,०००/- रुपये किंमतीचे २० ग्रॅम ८ मिली वजनाचे एक काळे मनी असलेले सोन्याचे लहान गंठण जु.वा.किं.सु. |
| ३. | तारापुर | ३५/२०२१<br>भा.द.वि.सं.क.३९२,३४ | ७०,०००/- रुपये किंमतीचे १५ ग्रॅम वजनाचे एक काळे मनी असलेले अर्धवट तुटलेले सोन्याचे मंगळसुत्र जु.वा.किं .सु |

सदरची कामगिरी मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर व मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.विश्वास वळवी, उपविभागिय पोलीस अधिकारी बोईसर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुरेश कदम, पोलीस निरीक्षक, बोईसर पोलीस ठाणे, श्री.श्रीकांत शिंदे, प्रभारी अधिकारी वाणगांव पोलीस ठाणे, सपोनि श्री.सुरेश साळुंखे, बोईसर पोलीस ठाणे, पोउपनिरी. शरद सुरळकर, पोउपिनरी. विजय डाखोरे, पोहवा/शरद सानप, पोना/संदिप सोनावणे, पोअंम./वसावे, पोअंम/संतोष वाघचौरे, पोअंम/देवेंद्र पाटील, पोअंम/अमित भारवाड, चापोना/किणी यांनी केलेली आहे.